# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ / अग्रहायण २९, १९४४ (शके)**

**(१) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**
**(२) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**
**(३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**
**(४) कृषि मंत्री**
**(५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
**(६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

## कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यामध्ये अनधिकृत खडीक्रशर सुरु असल्याबाबत

**(१) * १५७६७ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यात एकही अधिकृत खडीक्रशर नसताना महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करुन रात्री मोठ्या प्रमाणात अनधिकृत उत्खनन केले जात असल्यामुळे शासनाच्या करोडो रुपयांच्या महसूलाची हानी तसेच पर्यावरणाचादेखील ऱ्हास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ चेही उल्लंघन होत असल्यामुळे तहसिलदार, कर्जत यांनी चौकशी करुन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना तालुक्यातील अनधिकृत खडीक्रशराबाबत व त्यांच्यावर लावलेल्या दंडाबाबतचा अहवाल दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत खडीक्रशर प्रकरणाची मा.निवृत्त न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व खनिजकर्म अधिकारी यांच्यासह त्रिसदस्य उच्च समितीमार्फत चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.बंदरे व खनिकर्म मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागणीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) कर्जत तालुक्यात ११ क्रशरला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचेकडून खडीक्रशर उभारणी व वापराची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यापैकी ७ खडीक्रशर धारकांवर अवैध उत्खनन / वाहतुकीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६

मधील कलम (७) व (८) अन्वये एकूण रुपये ४८,१९,६८,५२५/- एवढ्या दंडात्मक रकमेची कार्यवाही करण्यात येऊन सदर वसुलीची तहसिलदार कर्जत यांचेकडून कार्यवाही सुरू आहे.

कर्जत तालुक्यात एकूण ०७ खाणपट्टयांना मंजुरी देण्यात आलेली होती. त्यापैकी पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक ११/०२/२०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार माळढोक पक्षी अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्र अधिसूचीत करण्यात आलेले आहे. सदर अधिसूचनेनुसार एकूण ०५ खाणपट्टे सद्य:स्थितीत बंद केले आहेत.

कर्जत तालुक्यातील अनधिकृत खडीक्रशर प्रकरणाची मा.निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण अधिकारी व खनिकर्म अधिकारी यांच्यासह त्रिस्तरीय उच्च समिती मार्फत चौकशी करण्यात यावी व या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत मा.मंत्री (बंदरे व खनिकर्म) यांच्याकडे मागणी केलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

-----------------

## बजाज अलायन्झ कंपनी, पुणे यांचेकडून शेतकऱ्यांना पीक विमा वाटप करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(२) * १५५८१ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद, बीड व लातूर जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी यावर्षी खरीप हंगामातील पीक विमा बजाज अलायन्झ कंपनी, पुणे येथे भरलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावा यासाठी लोकप्रतिनिधींनी दिरंगाई करणाऱ्या बजाज अलायन्झ कंपनी, पुणे यांचेविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सदर कंपनीची संपत्ती जप्त करण्यात यावी असे पत्र जिल्हाधिकारी, पुणे यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खरीप हंगामातील पीक विमा लाभधारक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यास दिरंगाई करणाऱ्या बजाज अलायन्झ कंपनी, पुणे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०२२-२३ करीता जिल्हानिहाय अंमलबजावणी कंपनी पुढीलप्रमाणे आहेत-

(१) बीड - बजाज अलायन्झ ज.इ.कं.

(२) उस्मानाबाद- भारतीय कृषि विमा कंपनी

(३) लातूर - भारतीय कृषि विमा कंपनी

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२२ करीता सदरील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तथापि, खरीप २०२० मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई वाटपाबाबत मा.सर्वोच्च न्यायालय भारत सरकार नवी दिल्ली यांनी दिनांक ०५ सप्टेंबर २०२२ रोजी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने विहित मुदतीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही न केल्याने बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीविरुध्द कारवाई करण्याचे पत्र जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना दिले आहे.

(४) खरीप हंगाम २०२२ मध्ये बीड जिल्ह्यात बजाज अलायन्झ ज. इ. कंपनीमार्फत दिनांक २९/११/२०२२ अखेर ४.५५ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये १३०.०२ कोटी निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी ३.४९ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये १२५.४७ कोटी वाटप करण्यात आले आहेत. उर्वरीत नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच खरीप हंगाम २०२० मधील विमा नुकसान भरपाई वाटपाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्याबाबतचे निर्देश मा.मंत्री (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/११/२०२२ रोजीच्या बैठकीत बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनीला देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यामध्ये विमुक्त जाती (अ) प्रवर्गाचे बनावट जात प्रमाणपत्र वितरीत केले जात असल्याबाबत

**(३) * १५९९६ श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १४१३८ ला दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात काही व्यक्तींकडून विमुक्त जाती (अ) प्रवर्गाचे बनावट जात प्रमाणपत्र निर्गमित केले जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पात्र लाभार्थी नोकरी मिळण्यापासून वंचित असून बनावट जात प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणाऱ्या व्यक्तींविरुध्द संबंधित विभागाकडे मा.लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात बनावट जात प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करणेबाबत

**(४) * १५३८३ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) सुरु करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रतिवर्षी रुपये २०००/- प्रमाणे तीन समान हप्त्यात रुपये ६०००/- देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-केवायसी असलेल्या शेतकऱ्यांनाच अनुदान देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्यामुळे राज्यातील २१ लाख शेतकरी अनुदान मिळण्यापासून वंचित असून दौंड तालुक्यातील सुमारे २५ हजारांपेक्षा अधिक व सोलापूर जिल्ह्यातील १ लाख ७३ हजार शेतकरी या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी सरसकट अनुदान दिले जात होते परंतु त्यामध्ये बदल करुन शेती नावावर असलेले मात्र प्राप्तीकर भरणारे, सरकारी कर्मचारी व अधिकारी, मोठे शेतकरी यांना हे अनुदान मिळणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील १५२ लाख शेतकरी कुटुंब असताना उक्त योजनेसाठी फक्त ११५ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून उर्वरीत ३७ लाख शेतकरी कुटुंब या योजनेसाठी पात्र की अपात्र असा शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून उक्त योजनेंतर्गत सर्व नावे निश्चित करुन यादी अद्ययावत करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ पर्यंतची मुदत केंद्र शासनाने राज्य शासनास देऊनही सदर यादी अद्याप निश्चित केली नसल्याचे दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर योजना भूमी अभिलेखांच्या पुराव्यांवरुन राबविण्यात येत असून सर्व अभिलेख हे महसूल विभागाच्या अखत्यारित असून योजनेंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी व मान्यता देण्याचे अधिकार देखील महसूल विभागाकडे आहेत परंतु सदर योजना कृषि विभागाची असल्याने योजनेच्या अंमलबजावणीचे काम महसूल विभाग करणार नसल्याचे महसूल विभागाने सांगितल्याचे दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाखो पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पी.एम.किसान योजनेच्या लाभार्थ्यांना माहे डिसेंबर २०२२ नंतरचे पुढील हप्त्यांचा लाभ अदा होणेसाठी e-KYC प्रमाणिकरण करणे केंद्र शासनाने अनिवार्य केले आहे.

योजनेअंतर्गत दिनांक ०२/१२/२०२२ अखेर पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील ५२,१०६ नोंदणीकृत शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण रुपये ९९.६९ कोटी तर सोलापूर जिल्ह्यातील ६,३७,४१७ नोंदणीकृत शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकूण रुपये १,२२७.७६ कोटी रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाने योजना सुरु करतेवेळीच पी.एम.किसान योजनेच्या लाभ अदायगीसाठी निश्चित केलेल्या पात्र/अपात्रतेच्या निकषांप्रमाणे क्षेत्र धारणेची मर्यादा न ठेवता योजनेच्या निकषांत बसणाऱ्या सर्व पात्र शेतकरी कुटुंबांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(४) अंशत: खरे आहे.

कृषि गणना २०१५-१६ नुसार राज्यात एकूण १५२.८५ लाख वहिती खातेदार संख्या असून त्यापैकी ११५.५५ लाख शेतकऱ्यांनी पी.एम.किसान योजनेसाठी नोंदणी केलेली आहे. राज्यातील उर्वरीत पात्र शेतकऱ्यांची नोंदणी करून संपृक्तता साध्य करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच केंद्र शासनाने PM-KISAN Portal वर शेतकऱ्यांना नोंदणी करण्यासाठी Farmer corner या Tab मधुन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर सुविधे अंतर्गत शेतकरी CSC केंद्रावर किंवा स्वत: योग्य त्या कागदपत्रांआधारे नोंदणी करत आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक १४ जून २०२२ रोजीच्या पत्रातील संपृक्तता साध्य करण्याच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १५ डिसेंबर २०२२ अखेर उर्वरीत पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करणे, अपात्र लाभार्थ्यांची माहिती पोर्टलवरून कमी करणे व योजनेचे लाभार्थी अंतिम करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु असून माहे जून, २०२२ नंतर दिनांक ०२/१२/२०२२ अखेर ०.५३ लाख लाभार्थ्यांची नोंदणी झालेली आहे.

(५) आणि (६) अंशत: खरे आहे.

मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजीच्या तसेच मा.मंत्री महसूल व मा.मंत्री कृषि यांच्या दिनांक २३ ऑगस्ट २०२२ रोजीच्या बैठकातील निर्देशांप्रमाणे भूमी अभिलेखानुसार डाटा अपलोड करण्याचे कामकाज महसूल विभागाने पूर्ण करण्याचे व प्रलंबित डाटा दुरुस्तीचे कामकाज महसूल, कृषि व ग्रामविकास विभाग यांनी सर्व समन्वयाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्याबाबत

**(५) * १५७०८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेतात काम करताना अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे इजा होऊन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना दिनांक ७ एप्रिल, २०२२ पासून बंद करण्यात आली असून जिल्हा कृषि कार्यालयाकडून या योजनेची प्रक्रिया सुरू असली तरी योजना सुरू करण्याबाबत शासनाकडून कोणत्याही स्पष्ट सूचना नसल्यामुळे अर्ज केलेले अनेक लाभार्थी योजनेच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जालना जिल्ह्यात मागील पाच वर्षांमध्ये या योजनेंतर्गत कृषि विभागाकडे दाखल करण्यात आलेले अनेक प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर योजनेमध्ये प्रशासकीय कारणास्तव दिनांक ०७/०४/२०२२ पासून खंड पडलेला आहे. सद्य:स्थितीत दिनांक ०७/०४/२०२२ ते २२/०८/२०२२ या खंडास खंडीत कालावधी म्हणून दिनांक २८/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष बाब म्हणून मान्यता प्रदान केलेली आहे. यानुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) योजनेंतर्गत जालना जिल्ह्यात मागील पाच वर्षांमध्ये वर्षनिहाय प्राप्त विमा प्रस्ताव, मंजूर प्रस्ताव, कंपनीकडे कार्यवाहीत प्रस्ताव, नामंजूर विमा प्रस्ताव व कागदपत्रांअभावी प्रलंबित प्रस्तावाबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे-

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | कंपनीकडे कार्यवाहीत | नामंजूर विमा प्रस्ताव | कागदपत्रा अभावी प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ७५ | ५२ | ० | २३ | ० |
| २०१७-१८ | १०५ | ७७ | ० | २८ | ० |
| २०१८-१९ | १२१ | ८७ | १ | ३३ | ० |
| २०१९-२० | १६९ | ९६ | २ | ५६ | १५ |
| २०२१-२२ | २१२ | ८१ | १८ | ३० | ८३ |

प्रलंबित प्रस्तावांबाबतची कार्यवाही विमा कंपनी स्तरावर व क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रचलित योजनेत सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(६) * १५४४६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने युपीएससीची पूर्वतयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मासिक विद्यावेतन रुपये दहा हजारावरुन तेरा हजार तसेच पीएचडी करणाऱ्या उमेदवारांना नोंदणी दिनांकापासून पहिल्या दोन वर्षासाठी रुपये ३१ हजार, घरभाडे, आकस्मिक खर्च देण्याचा ठराव झाल्याचे संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची सुरुवात बार्टी आणि सारथीच्या धर्तीवर झाली असली तरी या दोन्ही संस्थांच्या तुलनेत महाज्योतीकडून विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्यावेतन तुटपुंजे असून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पूर्व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या संस्थेमार्फत अद्यापही आकस्मिक निधी मिळालेला नसून वाढीव निधीचा प्रश्नही दुर्लक्षित असल्याने अनेक विद्यार्थी सदर प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संस्थेचे हजारो विद्यार्थी सदर लाभापासून वंचित असून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करणे आवश्यक असतानाही या संस्थेची एकही बैठक न झाल्याने विविध योजना प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण या दुर्बल घटकांच्या विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून त्यासंदर्भात बैठका घेणे, प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधने, विद्यार्थ्यांना आकस्मिक निधी, वाढीव निधी, ठरावावर निर्णय घेणे इ. योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीची उपलब्धता करुन देणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, महाज्योती संस्थेच्या दिनांक २६/९/२०२२ रोजी महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सारथी व बार्टीच्या धर्तीवर पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम दोन वर्ष दरमाह रुपये ३१०००/- घरभाडे व आकस्मिक निधी व उर्वरीत तीन वर्ष दरमाह रुपये ३५०००/- घरभाडे व आकस्मिक निधी अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार, वाडा व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागांतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७) * १५२१३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, वाडा व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ आणि २०१७-२०१८ या तीन वर्षांच्या कालावधीमध्ये सामाजिक वनीकरण विभागांतर्गत रुपये ७८ कोटीच्या निधीतून कोणतीही कामे न करता ७४ गावात एकूण ८९९ कामे केल्याचे दर्शवून या सर्व कामांची खोटी देयके सादर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खोटी देयके सादर केल्याप्रकरणी नागरिकांनी तक्रारी केल्या असून सदर तक्रारीन्वये पाच पथकांची नेमूणक करण्यात येऊन चौकशीअंती रुपये ७८ कोटी १७ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या पाणलोट विकास योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण विभाग, ठाणे यांनी तीन तालुक्यांमध्ये जल व मृदा संधारण, दगडी बांध उभारणे व तुटक समतोल, चर खणणे यासाठी रुपये ६१.२२ कोटींचा निधी वर्ग केला तसेच नाशिक कार्यालयामार्फत याच भागांमध्ये दगडी बांध उभारणे, तुटक समतोल, चर खणणे इ.साठी स्वतंत्रपणे रुपये १४.९५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू तक्रारीनुसार जव्हार पोलीस ठाण्यात दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी सामाजिक वनीकरण विभागाचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, लागवड अधिकारी, वनपाल, रोपवन व कोतवाल अशा संबंधित दहा अधिकारी/कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गैरव्यहाराची रक्कम संबंधितांकडून वसूल करुन घेणेबाबत व कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या पाणलोट विकास योजनेतंर्गत सामाजिक वनीकरण विभाग, ठाणे यांनी तीन तालुक्यांमध्ये जल व मृद संधारण, अनगड दगडी बांध उभारणे व तुटक समतल, चर खणणे यासाठी आदिवासी विकास विभागाकडून थेट वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे यांचे स्तरावर अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर खालीलप्रमाणे रक्कम प्राप्त झाली.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २०१५-१६ ते २०१७-१८ | रुपये ६३, २१,६७,९६० |

तसेच आदिवासी विकास, विभाग, नाशिक कार्यालयामार्फत याच भागांमध्ये दगडी बांध उभारणे, तुटक समतोल, चर खणणे ई. साठी स्वतंत्रपणे रुपये १४,९५,१०,९०८/- निधी धनाकर्षाद्वारे थेट विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, ठाणे यांचे नावे सन २०१७-१८ मध्ये प्राप्त झाला.

(४) हे खरे आहे.

श्री शशांक कदम, वनक्षेत्रापाल, सामाजिक वनीकरण, ठाणे अतिरिक्त कार्यभार, सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे यांनी दिनांक १२/१०/२०२२ रोजी जव्हार पोलीस ठाणे येथे श्री.अन्वर अहमद, तत्का. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण, ठाणे व इतर ९ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द प्रथम सुचना अहवाल (FIR)दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांच्या कार्यालयाकडे तपासाधीन आहे.

(५) होय.

उपरोक्त प्रकरणी करण्यात आलेल्या कामांची १००% तपासणी करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे यांच्या दिनांक ०२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये ५ तपासणी पथके गठीत करण्यात आली होती. सदर तपासणी पथकांनी दिलेल्या अहवालानुसार, प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार, सदर प्रकरणी दोषी असलेल्या १० अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द जव्हार पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच संबंधितांवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत अनुदान मिळणेबाबत

**(८) * १५४१३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन योजना सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ मधील ता.माजलगाव (जि.बीड) येथील ७८ शेतकऱ्यांची नावे सन २०१९ मध्ये अनुदानासाठी निश्चित (फिक्सिंग ऑफ सबसिडीसाठी) करण्यात येऊनही संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी वेळोवेळी तालुका, जिल्हास्तरावर तसेच कृषि सचिव यांच्याकडे पाठपुरावा करूनही शेतकरी संबंधित अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानासाठी प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) होय.

बीड जिल्ह्यातील सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील ५१४ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये माजलगाव तालुक्यातील ७८ शेतकऱ्यांचा समावेश आहे. सदर ५१४ प्रकरणांची विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांचेकडून मोका तपासणी करुन रुपये १.६२ कोटी अनुदानासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गल्लेबोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करणेबाबत

**(९) * १५३१९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अद्रक पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येत असून विशेषत: औरंगाबाद जिल्ह्यात १८,००० हेक्टर क्षेत्रावर अद्रक पिकाची लागवड केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना सुधारित वाण व उत्तम प्रतीचे बियाणे उपलब्ध होत नसल्याने तसेच अद्रक पिकाच्या उत्पादनात बदलत्या हवामानानुसार मोठ्या प्रमाणात कंदकुज, कंदमाशी व सुक्ष्मकृमीच्या होत असलेल्या प्रादुर्भावामुळे घट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, लागवड पध्दत, बियाणे प्रक्रिया, खत व्यवस्थापन या सोबतच मुल्यवर्धन इत्यादी समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यात अद्रक/मसाले पीक संशोधन केंद्राची आवश्यकता असल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने गल्लेबोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्यास मान्यता मिळविण्यासाठी सादर केलेला परिपूर्ण प्रस्ताव कृषि परिषदेने दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी मान्य करुन शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गल्लेबोरगांव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

देशात अद्रक लागवडीखालील क्षेत्र हे एकूण १७,५०० हेक्टर एवढे असून, महाराष्ट्र राज्यात विशेषत: मराठवाडा विभागात अद्रक लागवडीखालील क्षेत्र जवळपास ५,३४५ हेक्टर इतके आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत तालुका बीजगुणन केंद्र, गल्लेबोरगाव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापनेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी ठराव क्र.०८/१०८/२०२२ दिनांक २२/०९/२०२२ अन्वये

प्रशासकीय मान्यता प्रदान करून शासनाकडे शिफारशीत केला आहे. त्यानुषंगाने वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे गल्लेबोरगाव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्यास मान्यता मिळणेबाबतचा मंत्रिमंडळ प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील ८ वी, ९ वी व १० वी च्या वर्गांना विनाअनुदान तत्वावर नियमबाह्य पध्दतीने मान्यता दिल्याबाबत

**(१०) * १६००९ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जात असून सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या कालावधीत इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या वर्गास विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५० ते २०० पर्यंतच्या वर्गांना विनाअनुदान तत्वावरील मान्यता मंत्रिमंडळाची व वित्त विभागाची अनुमती न घेता नियमबाह्य पध्दतीने दिली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुढील आदेश होईपर्यंत विनाअनुदान तत्त्वावर देण्यात आलेल्या मान्यतांना स्थगिती देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधिनस्त स्वयंसेवी संस्था मार्फत चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या अनुदानित प्राथमिक (१ ते ७ वी) निवासी आश्रमशाळेतील ७ वी उत्तीर्ण होणाऱ्या ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी पासून पुढे शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी संस्थाचालकांची विनंती व लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनुसार शासन परिपत्रक इ.मा.ब.क.विभाग, दिनांक २९/१०/२०२० नुसार वित्त विभागाच्या मान्यते अधिन काही संस्थांकडून “स्वखर्चाने वर्ग चालवतील”, असे शपथपत्र घेऊन नैसर्गिक वाढीने इयत्ता ८ वी, ९ वी व १० वीचे वर्ग मंजूर करण्यात आले आहेत.

(३) असे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्राप्त झाल्यास याबाबत तपासणी करण्यात येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पीक कर्जाच्या एकरकमी परतफेड योजनेंतर्गतच्या लाभार्थी शेतकऱ्यांना बँकांनी नवीन पीक कर्ज देणेबाबत

**(११) * १५८७२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पीक कर्जाची एकरकमी परतफेड योजना (वनटाईम सेटलमेंट) तसेच कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना बँकांनी नवीन पीक कर्ज नाकारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्ज देणे नाकारल्यामुळे राज्यातील सावकारी कर्जामध्ये वाढ होत असल्यामुळे अवैध सावकारांविरोधात सहकार विभागाकडे आर्थिक वर्षात ८८२१ एवढ्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एकरकमी परतफेड योजनेंतर्गत शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज मिळण्याबाबत तसेच अवैध सावकारी विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.

(२) सुधारित सावकारी अधिनियम दिनांक ०४/०४/२०१४ रोजी अंमलात आल्यापासून मार्च, २०२२ अखेर ८८२१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) राज्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२२ अखेर बँकांनी खरीप पीक कर्ज वाटप लक्षांक रुपये ४५,०९१ कोटी पैकी रुपये ३८,८०६ कोटीचे पीक कर्ज वाटप एकूण ४२.८४ लाख शेतकऱ्यांना (लक्षांकाच्या ८४ %) केले आहे.

शासन निर्णय दिनांक २७/०६/२०२२ अन्वये प्रत्येक तालुक्यामध्ये स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमार्फत पीक कर्ज वाटप प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.

अवैध सावकारी विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १८(२) अंतर्गत कार्यवाही करुन ८२५ प्रकरणांमध्ये आदेश पारित केलेले असून त्यानुसार ४७३ हेक्टर जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यात आल्या आहेत तसेच ४०७ प्रकरणामध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मच्छीमारांसाठी शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक पॅकेज जाहीर करणेबाबत

**(१२) * १५५६८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवर वादळी वाऱ्यांसह कोसळणाऱ्या पावसामुळे मासेमारीसाठी गेलेल्या हजारो बोटी विनामासे परतल्यामुळे मच्छिमार बांधव आर्थिक अडचणीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातत्याने वाढणारा इंधन दर, मासेमारीसाठी आवश्यक असणाऱ्या सामुग्रीचे म्हणजे रंगरंगोटी, जाळी, मशीनचे सुटे भाग, बर्फ यांच्या किंमतीत दिवसेंदिवस वाढ होणे, खोल समुद्रातील मासळी पकडण्यासाठी पूर्वीपेक्षाही अधिक सागरी अंतर पार करावे लागणे, त्यामुळे आठ-दहा दिवसांचा प्रवास बारा ते पंधरा दिवसांचा होणे इत्यादी कारणांमुळे मच्छिमार बांधवांच्या खर्चात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत दोन वर्षापासून कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांना वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून मच्छिमार बांधवांसाठी शेतकऱ्यांप्रमाणे आर्थिक पॅकेज जाहीर करून आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे ऑगस्ट, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीतील खराब वातावरणामुळे मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०१९-२० या कालावधीत राज्यातील सागरी मच्छिमारांना क्यार व महा चक्रीवादळामुळे पूर्ण क्षमतेने मासेमारी करता न आल्यामुळे रुपये ६५,१७,२०,०००/- इतके विशेष सानुग्रह अनुदान अदा करण्यास शासन निर्णय दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ४८.२७ कोटी इतका निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला असून उर्वरीत निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

निसर्ग व तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानापोटी अनुक्रमे रुपये १.३६७ कोटी व रुपये ९.२८०६ कोटी इतकी रक्कम महसूल विभागाकडून बाधित मच्छिमारांना देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेंढपाळांच्या विविध मागण्यांवर उपाययोजना करण्याबाबत

**(१३) * १६२०४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळाचे सक्षमीकरण करणे, मेंढपाळांसाठी चरई क्षेत्र निर्माण करणे इ. मागण्यांसाठी धनगर समाजबांधवांच्या संघटनांनी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आंदोलनादरम्यान मेंढपाळांवरील दाखल गुन्हे मागे घेणे, वनजमिनीवरील अतिक्रमण काढून टाकणे तसेच मेंढपाळासाठी फिरते पशुचिकीत्सालयाची सुविधा राज्यातील ८० तालुक्यांमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत तत्कालीन राज्यमंत्री, वने यांनी बैठक आयोजित केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मेंढपाळांच्या विविध मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०२२ मध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये धनगर समाजाच्या संघटनांकडून मेंढया चारण्याकरीता चराई क्षेत्र उपलब्ध करुन देणे, चराई क्षेत्रासाठी पासेस देणे व अन्य मागण्यांबाबत आक्रोश मोर्चा / आंदोलनाचे आयोजन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

तत्कालिन राज्यमंत्री (वने व पदुम) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/०४/२०२२ रोजी आयोजित बैठकीमध्ये धनगर समाजाला वृक्ष लागवडीच्या अटीवर वन जमीन चराईसाठी उपलब्ध करुन देणे व इतर मुद्यांसंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच शेळी-मेंढी व्यवसायासंदर्भात कार्यशाळा आयोजित करण्याचे व राज्यामध्ये फिरते पशुचिकीत्सा पथकाची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले.

मा.मंत्री (वने) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/१०/२०२२ रोजी मेंढयांसाठी चराई कुरण राखीव करण्याबाबत व मेंढपाळांच्या इतर समस्यांसंदर्भात बैठक संपन्न झाली आहे. सदर बैठकीमध्ये खालील नमूद मुद्यांबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वनवृत्त स्तरावर आढावा घेऊन वन क्षेत्रात मेंढी चराईसाठी उपलब्ध होणारे क्षेत्र तसेच महसूल, जलसंपदा (धरण क्षेत्रात पाणी आटल्यानंतर उपलब्ध होणारे क्षेत्र) विभागा अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या क्षेत्राची माहिती संकलित करण्याकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधणे बुलढाणा, यवतमाळ, अमरावती व जळगाव या जिल्ह्यांमध्ये अंदाजे १००० एकर क्षेत्राची निवड करुन तेथे अर्धबंदिस्त मेंढी पालन करण्याची शक्यता पडताळणे.
मेढपाळांवर कोणत्याही परिस्थितीत विभागाच्या वन कर्मचाऱ्यांकडून मारहाण होणार नाही याबाबत क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना देणे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतंर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणेबाबत

**(१४) * १५२७५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतंर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा तीन वर्षांपूर्वी करण्यात येऊन, त्यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: कोल्हापूर व बुलढाणा जिल्ह्यातील पीक कर्जाची नियमित परफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याचे जाहीर करुनही अद्यापपर्यंत शेतकरी प्रोत्साहन अनुदानापासून वंचित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे अनुदान वितरीत करण्याची शासनामार्फत सुरुवात करण्यात आली होती, तथापि, जिल्हा बँकेने शासनाच्या पोर्टलवर पात्र शेतकऱ्यांच्या भरलेल्या माहितीची पडताळणी केली असता, ७ लाख ७७ हजार शेतकऱ्यांच्या माहितीमध्ये नाव, खाते क्रमांक, बंद खात्याचा क्रमांक अपलोड करणे, इन ऑपरेटीव्ह क्रमांक नमूद करणे इ. नोंदीत चुका झाल्याने शेतकरी उक्त लाभापासून वंचित राहिल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चुकीच्या माहितीमध्ये दुरुस्ती करुन सुधारित माहिती दोन दिवसांत पाठविण्यात यावी असे सहकार विभागाने संबंधित जिल्हा बँकांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त योजनेंतर्गत जिल्हानिहाय पात्र शेतकरी किती आहेत व पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच उर्वरित पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान वाटप करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) व (३) अंशतः खरे आहे.
(४) होय.
(५) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या एकूण ७.२० लाख शेतकऱ्यांना रुपये २६३७.२२ कोटी इतक्या रकमेचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये उर्वरीत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी बँकांमार्फत रुपये ८.९१ लाख कर्जखात्यांचे संगणकीय संस्करण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उपसा जलसिंचन योजनेंकरीता सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाची गैरपध्दतीने आकारणी करण्यात येत असल्याबाबत

**(१५) * १५५९० श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांनी उपसा जलसिंचन योजना उभी केली असून उक्त योजनेकरीता सहकारी बँकांकडून घेतलेल्या १४ टक्के व्याज दराच्या मुद्दलावर तीन ते पाच पट व्याजाची आकारणी करुन शेतकऱ्यांकडून कर्ज वसुली करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि मूल्य आयोग प्रदेश (किसान मोर्चा) यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपसा जल सिंचन योजनेंतर्गत कर्जमाफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.

राज्यातील शेतकऱ्यांनी उपसा जलसिंचन योजनांकरीता सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जावर संबंधित बँका रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसारच व्याज आकारणी करतात. अद्यापपर्यंत राज्यातील कोणत्याही बँकेने गैरपध्दतीने व्याज आकारणी केल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) अंशत: खरे आहे
(३) सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि मूल्य आयोग, उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश (किसान मोर्चा) यांनी मा.श्री.रामदास आंबटकर, वि.प.स. यांना लिहीलेल्या दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रावर मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने विनानिविदा प्रशिक्षणासाठी ज्ञानदीप अकादमी, पुणे ची निवड केल्याबाबत

**(१६) * १५८६० श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (महाज्योती) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभ्यासक्रमात बदल झाल्यानंतरही प्रशिक्षण केंद्रासाठी नवीन निविदा प्रक्रिया न काढता ज्ञानदीप अकादमी, पुणे ची निवड केली असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना एमपीएससी प्रशिक्षणासाठी ज्ञानदीप अकादमी, पुणे येथे प्रशिक्षणासाठी कागदपत्रांची तपासणी व छायांकीत प्रत जमा करण्याच्या सूचना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सूचनेप्रमाणे हजारो विद्यार्थ्यांनी ज्ञानदीप अकादमी, पुणे ची निवड केली होती परंतु, महाज्योतीने दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी नवीन पत्रक काढून या प्रशिक्षण केंद्रास स्थगिती दिल्याने हजारो विद्यार्थ्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंत्राट विविध संस्थांना दिल्यास विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी विकल्प निर्माण झाला असता परंतु, महाज्योतीने संस्थेच्या संचालकांचे ज्ञानदीप ॲकडमी, पुणे यांच्याशी हितसंबध असल्यामुळे सदरहू रुपये १५ कोटीचे कंत्राट ज्ञानदीप अकादमी, पुणे यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर संस्था पंधराशे विद्यार्थ्यांना ऑफलाईन प्रशिक्षण देत असून एमपीएससीच्या अभ्यासक्रमात मोठा बदल केल्याने २७ वैकल्पिक विषय असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी एक वैकल्पिक विषयाची निवड करीत असल्याने सदर प्रशिक्षणासाठी किमान तीन संस्थांचा समावेश करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रशिक्षणासाठी तीन संस्थाचा समावेश करणे तसेच महाज्योतीच्या संचालकांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही. संस्था निवडीसाठी रितसर निविदा काढण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित राज्यसेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर बदल करण्यात आल्याने ज्ञानदीप अकादमीची तपासणी प्रकिया दिनांक १०/१०/२०२२ अन्वये स्थगित करण्यात आली होती. तथापि, ज्ञानदीप अकादमीने अभ्यासक्रम सुधारीत करण्याची हमी दिल्यानंतर दिनांक १४/१०/२०२२ रोजी सदर तपासणी प्रक्रीया पूर्ववत करण्यात आली.

सदर संस्थेसोबत सन २०२१-२२ मध्ये केलेल्या सामंजस्य करारात पुढील २ वर्षे मुदतवाढ देण्याची तरतूद असल्याने पूर्वी निर्धारीत केलेल्या दराने ज्ञानदीप संस्थेस सन २०२२-२३ करीता १ वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय दिनांक १७ जून, २०२२ रोजीच्या महाज्योती संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता.करारानूसार ज्ञानदीप संस्थेस प्रती प्रशिक्षणार्थी रुपये ४७,७००/- या दराने प्रशिक्षण शुल्क देण्याचे निश्चित केले असून सध्या प्रशिक्षण घेत असलेल्या १५०० प्रशिक्षणार्थींसाठी एकूण रुपये ७.१५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गायरान जमिनीवरील अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत

**(१७) * १५१२२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.एकनाथराव खडसे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गायरान जमिनीच्या वापरावर बंधने घालण्यात आली असून केवळ शासनाकडून संमत असलेल्या सार्वजनिक प्रकल्प व कामांकरीता गायरान जमिनींचा वापर करता येतो याबाबतचा शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने मागितलेल्या तपशिलानुसार राज्यात १० हजार ८९ हेक्टर गायरान जमीन अतिक्रमणाखाली असून त्यावर २ लाख २२ हजार १५३ अनधिकृत बांधकामे असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गायरान जमिनीवरील सदर अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबतचा कृती आराखडा माहे डिसेंबर, २०२२ अखेर सादर करण्याचा निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदेशानूसार गायरान जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच प्रत्येक जिल्ह्यात ज्या ठिकाणी अतिक्रमण झाले ते अतिक्रमण निष्कासित करण्याची नोटीस महसूल विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर जागेवरील अनधिकृत बांधकामे हटविल्यास या जागांवर घरे बांधून, मजूरी करुन उपजिवीका करणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंब बेघर होणार असून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होणार असल्याने याप्रकरणी कायद्यात आवश्यक तो बदल करणे अथवा मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गायरान जमिनीवरील अनधिकृत बांधकामे हटवून गायरान जमिनीचे संरक्षण करणे व अतिक्रमण धारकांना दिलासा देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) गायरान जमिनीवरील अनधिकृत बांधकामे ही वर्ष-अखेर पर्यंत निष्कासीत करण्याबाबतचा रोडमॅप सादर करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने विचाराधीन जनहित याचिका प्रकरणी आदेश दिले आहेत. त्यानुसार प्रतिज्ञापत्राद्वारे रोडमॅप मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.
(४) होय, हे खरे आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६) शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र.एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७/११/२०१८ तसेच शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्र.प्रआयो-२०१७/ प्र.क्र.३४८/ योजना-१०, दिनांक १६/०२/२०१८ आणि शासन निर्णय, क्र.प्रआयो-२०२१/प्र.क्र.८१/योजना-१०, दिनांक २२/०८/२०२२ मधील तरतूदीनुसार पात्र असलेली तसेच शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणानुसार/ तरतुदीनुसार संरक्षित होणारी अतिक्रमणे वगळून उर्वरित अतिक्रमणे निष्कासित करावी, अशी शासनाची भूमिका आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या आदेशान्वये निष्कासनाच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई व मुंबई उपनगरातील किल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत

**(१८) * १५४७६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.सचिन अहिर, श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऐतिहासिक असलेल्या सर्वात उंच शीव (सायन) किल्ल्याची पडझड झाल्यामुळे बुरूज ढासळून भिंती कोसळत असून मुख्य बांधकाम जीर्ण झाले असल्यामुळे ऐतिहासिक ठेवा नामशेष होण्याची भिती गडप्रेमी व्यक्त करीत असून किल्ल्याचे नुतनीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींनी केली असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती शिवरायांच्या अतुलनीय पराक्रमाने,अमोघ कर्तृत्वाने व पदस्पर्शाने पावन झालेल्या राज्यातील अनेक ऐतिहासिक गडकिल्ल्यांवर विशेषत: धारावी व माहिम येथील किल्ल्यांवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अतिक्रमण झाल्यामुळे स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१८ पासून तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींनी केलेल्या मागणीनूसार शीव (सायन) किल्ल्याच्या नुतणीकरणाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेनूसार आराखडा बनविण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर अतिक्रमणे हटविणे, मुंबई व मुंबई उपनगरातील किल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याकरीता केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

सायन किल्ला हा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई यांच्या अखत्यारीतील राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. अतिवृष्टीमुळे या किल्ल्याचा बुरूज ढासळला आहे.

(२) हे खरे आहे.

धारावी या राज्य संरक्षित स्मारकाच्या आतील भागात अतिक्रमण नाही. तथापि, किल्ल्याच्या सभोवतालच्या तटभिंतीलगत भिंतीला लागून अतिक्रमणे आहेत. तसेच माहिम किल्ल्यातील अतिक्रमण धारकांना इतर ठिकाणी स्थलांतरीत केले असून अतिक्रमीत बांधकामे पाडण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरू आहे.

(३) होय.

अतिवृष्टीमुळे या किल्ल्याच्या ढासळलेल्या बुरूजाचे दुरूस्तीचे अंदाजपत्रक भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई यांनी तयार करून निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु निविदेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे फेरनिविदा काढण्याची प्रक्रीया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांकरीता कृषि विभागामार्फत अनुत्पादक योजना राबविल्या जात असल्याबाबत

**(१९) * १५७८६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप हंगाम सुरु होण्याच्या अगोदर पोषणयुक्त सुरक्षित अन्न योजनेच्या नावाखाली शेतकऱ्यांना भाजीपाला बियाणांच्या पाकिटांचे वितरण, भरड व कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत निकृष्ट बियाणांचे वाटप तसेच "माझी पॉलिसी माझ्या हाती" आणि "एक दिवस शेतकऱ्यांसोबत" यासारख्या अनुत्पादक योजना राबविण्यात येऊन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दीड कोटी शेतकऱ्यांपैकी पाच लाख शेतकऱ्यांना कृषि विकास कार्यक्रमांतर्गत माहे ऑगस्ट, २०२२ अखेरपर्यंत भरडधान्य आणि कडधान्यांच्या बियाणांच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना अनुत्पादक असून योजना राबविण्यासाठी शासनाचा निधी व कर्मचाऱ्यांच्या वेळेचा सदुपयोग होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यासाठी संशोधन, सिंचन आणि बाजार केंद्र सुरू करून शेतकऱ्यांना पोषणयुक्त सुरक्षित अन्न योजनेचा लाभ देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या योजनांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे व त्या अनुषंगानेच योजना राबविल्या जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चारकोप (कांदिवली (प.), मुंबई) येथील भागांतील खारफुटीवरील अवैध बांधकाम रोखण्याबाबत

**(२०) * १५२०८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (प.) चारकोप येथील सेक्टर ८ व ९ या भागांत खारफुटी शिल्लक असल्याने हे क्षेत्र संरक्षित वन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदर भागातील पोलीस ठाण्याच्या मागील खारफुटीत मोठ्या प्रमाणावर अवैध बांधकामे होत असल्याची बाब दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका, वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयाने वारंवार कारवाई करूनही या ठिकाणी समाजकंटकांकडून पुन्हा नव्याने अवैध झोपड्या, गोदामे आणि गाळे उभारून जाहीरपणे विकली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी मुख्यत: पावसाळ्यात शासकीय यंत्रणा कारवाई करण्यास येणार नाही या अंदाजाने खारफुटीची कत्तल करून नवीन अवैध बांधकामे केली जात असून ही बांधकामे वाढण्याची भिती अनेक पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांदिवली (प.) येथील चारकोप सेक्टर ८ व ९ या भागातील खारफुटीवरील अवैध बांधकाम रोखून पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे चारकोप येथील राखीव वन म्हणून अधिसूचित कांदळवन क्षेत्रामध्ये खारफुटीची कत्तल करुन नवीन अवैध बांधकाम निदर्शनास आलेले नाही. तथापि, अधिसूचित कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. च्या बफर झोन मध्ये झोपड्यांचे अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

तथापि, मौजे चारकोप येथे अधिसूचित राखीव कांदळवनात नव्याने अवैध झोपड्या, गोदामे आणि गाळे उभारून जाहीरपणे विकली जात असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच कांदळवन क्षेत्रापासून ५० मी. च्या बफर झोन मध्ये आढळलेल्या अवैध बांधकामाविरुध्द महसूल विभाग, वन विभाग (कांदळवन कक्ष), बृहन्मुंबई महानगरपालिका व पोलीस प्रशासनामार्फत संयुक्त स्थळपहाणी करुन अतिक्रमण / कांदळवन ऱ्हास आढळून आल्यास निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

मुंबई कांदळवन संधारण घटक विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण होऊ नये तसेच कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन होण्याकरीता अधिसूचित कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर संरक्षक भिंत व तारेच्या कुंपणाचे काम सुरु आहे. अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्राच्या संरक्षणाकरीता क्षेत्रिय कर्मचारी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांद्वारे गस्त घालण्यात येते. तसेच ५० मी. बफर झोन मधील शासकीय मिळकतीस संरक्षक भिंत बांधण्याबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु करण्याबाबत

**(२१) * १६२५० श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थी वसतिगृह आणि विविध योजनांपासून वंचित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मागील ७५ वर्षापासून इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यासाठी एकही वसतिगृह नसल्यामुळे तत्कालीन सरकारने दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी परिपत्रक काढून इतर मागासवर्गीय कल्याण मंत्रालय स्वतंत्र करुन वेगळ्या वसतिगृहाची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी राहण्याकरीता निर्वाह भत्ता मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरू करुन उक्त योजनेंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवास, जेवण व इतर सुविधा पुरविण्यासाठी इतर मागासवर्गीय कल्याण विभागाने निधी पुरवावा अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय, विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाज्योतीच्या माजी संचालकांनी इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु करण्यासंदर्भात वर्धा जिल्ह्यात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने तसेच निर्वाह भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे** : (१) व (२) केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून राज्यातील इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृहे सुरू करण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक-इमाव-२०१६/ प्र.क्र.५८/ विजाभज-१, दिनांक ३०/०१/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत वसतिगृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध झालेल्या नागपूर, अहमदनगर, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांचे प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून केंद्र शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४), (५) व (६) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयांच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे भाड्याच्या इमारती घेऊन, मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांच्या (N.G.O) माध्यमातून सुरु करण्यास व त्यासाठी रुपये ७३.८१ कोटी इतक्या खर्चास दिनांक २९/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## मौजे कोयलीविहीर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) गावातील वारस फेरफार नोंद प्रकरणाबाबत

**(२२) * १६१९१ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोयलीविहीर (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) या गावात शेती सर्व्हे नं. ८२ या शेतजमिनीवर वारस नोंद करण्याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी तहसिलदार यांच्याकडे सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करुनही तहसिलदार, अक्कलकुवा यांच्याकडून उक्त प्रकरणाची दखल घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारसा फेरफार नोंद करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून तहसिलदार, अक्कलकुवा यांच्याकडून एक लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदार, अक्कलकुवा यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन राज्यमंत्री, मा.महसूल व ग्रामविकास यांच्याकडे दिनांक १८ मे, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कोयलीविहीर, ता.अक्कलकुवा येथील सर्व्हे नं. ८२ या शेतजमिनीवर अधिकार अभिलेखात नाव दाखल करण्याबाबतचा अर्ज संबंधितांनी दिनांक ०७/०६/२०२१ रोजी तहसिलदार कार्यालय, अक्कलकुवा, जि.नंदुरबार यांच्याकडे सादर केला होता.सदर अर्ज तत्का.तहसिलदार, अक्कलकुवा यांनी दिनांक १०/०५/२०२२ रोजी सुनावणी घेऊन उक्त अर्ज निकाली काढण्यात आल्याचे अर्जदारास दिनांक २०/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत तत्का. तहसिलदार, अक्कलकुवा हे उक्त वारस नोंदीच्या प्रकरणात लाचेची मागणी करत असल्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८/०५/२०२२ रोजी तत्का. राज्यमंत्री (महसूल,ग्रामविकास,बंदरे, खार जमिनी विकास व विशेष सहाय्य) यांच्याकडे सादर केले होते. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांना सविस्तर चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत निदेश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी उपविभागीय अधिकारी, तळोदा भाग, तळोदा यांना सविस्तर चौकशी करण्याबाबत निर्देशित केले आहे. तथापि, त्यांचा चौकशी अहवाल अद्यापि प्राप्त झालेला नाही. त्यानुषंगाने, प्रस्तूत प्रकरणातील चौकशी अहवाल तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नाशिक यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पास मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत

**(२३) * १५९१४ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना देशांतर्गत व जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्याकरीता आवश्यक तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा यासाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प सुरु होवून १८ महिने झाले तरीही या प्रकल्पास पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले नसल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पास दिलेल्या अपुऱ्या मनुष्यबळाच्या मुद्याची जागतिक बँकेने दखल घेत माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर मनुष्यबळ उपलब्ध करुन न दिल्यास हा प्रकल्प बंद करण्यात येईल असे सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पास पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे तसेच प्रकल्पाची फेररचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाही. तथापि, जागतिक बँकेने माहे ऑगस्ट, २०२२ अखेर ४१% पदभरती झाल्याची बाब विचारात घेऊन पदभरतीची कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुसार प्रकल्पाने आजपर्यंत मंजूर आकृतीबंधातील ७८% पदे भरली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतिगृहे सुरु करणेबाबत

**(२४) * १६११८ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक १२०५५ ला दिनांक १० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी एक अशी एकूण ७२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्यासाठी शासनामार्फत निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय वसतिगृहे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ याप्रमाणे ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे भाड्याच्या इमारती घेऊन, मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांच्या (N.G.O) माध्यमातून सुरु करण्यास व त्यासाठी रुपये ७३.८१ कोटी इतक्या खर्चास दिनांक २९/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) तालुक्यामध्ये गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाल्याबाबत

**(२५) * १६१७५ श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यात गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असून सदर पिकाची नुकसान भरपाई देण्यासाठी शेतकऱ्यांनी रेणापूर बंदचे आवाहन करत आंदोलन करण्यात आले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ दिवसांत अनुदान देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) चालु हंगामामध्ये शंखी गोगलगायीमुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने दिनांक १४/०९/२०२२ रोजी निर्गमित केला आहे. रेणापूर तालुक्यात २५०० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी रुपये ३४० लक्ष अनुदान वाटप केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील दापचरी दुग्ध प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२६) * १५१८४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील दापचरी दुग्ध प्रकल्पाच्या सन २०१०-२०११ ते २०२१ या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुपये १८ कोटी खर्च करून रुपये ४५ लाखांचा आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर्थिक गैरव्यवहार व अनियमिततेची सदोष चौकशी करण्यासाठी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये दुग्ध प्रकल्पाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली माहे मार्च, २०२२ वा त्या सुमारास समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने दापचरी दुग्ध प्रकल्पातील आर्थिक गैरव्यवहार व अनियमिततेची सदोष चौकशी पूर्ण करून एका महिन्यात आपला अहवाल शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दापचरी दुग्ध प्रकल्पासंदर्भातील चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालानूसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये आयुक्त, दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) व (४) व (५) सदर तक्रारीतील बहुतांश मुद्दे हे तांत्रिक स्वरूपाचे असल्याने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यामध्ये अवैधरित्या गौण खनिज उत्खनन व वाळू उपसा होत असल्याबबात

**(२७) * १५२८६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील तापी नदीकाठावरील पात्रातून व कुऱ्हा काकोडा परिसरात, थेरोळा, पिंप्राळा, धुपेश्वर पुलाजवळ पूर्णा नदीपात्रातून तसेच सातोड येथे मोठ्या प्रमाणात जेसीबी मशिन, पाणबुडी व यंत्रसामुग्रीद्वारे गौण खनिज उत्खनन व अवैधरितीने वाळू उपसा करताना तहसिलदार, मुक्ताईनगर यांनी एक जेसीबी मशिन व एक डंपर जप्त केला असल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी हजारो ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन करुन वाळू माफियांनी शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुध्द कारवाई करण्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, नाशिक, जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी मुक्ताईनगर तालुक्यातील मौजे सातोड शिवारात गट नं.१७४/१ मध्ये ४१.९१ ब्रास मुरुमाचे उत्खनन केल्याचे आढळून आले असून मुरूम उत्खनन करतांना एक जेसीबी व एक डंपर जप्त करण्यात आलेला आहे. जेसीबी मालक,

डंपर मालक व अवैध उत्खनन करणाऱ्यांविरुध्द रक्कम रू १६,५९,६४२/- इतक्या दंडात्मक रकमेच्या नोटीस देण्यात आलेल्या आहेत. मा.दिवाणी न्यायालय, मुक्ताईनगर यांच्या आदेशान्वये जेसीबी सोडण्यात आलेले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी अवैध वाळू उपसा करणांऱ्याविरुध्द कारवाई करण्याबाबतची तक्रार दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी केली असून त्यानुषंगाने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना गौण खनिजाचे व वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तसेच, जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दक्षता पथक तसेच, महसूल, परिवहन व पोलीस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. त्यानुसार मुक्ताईनगर तालुक्यात अवैध उत्खनन व वाहतूक करतांना दिनांक १ एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ पर्यंत १२ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली असून त्यांना रक्कम रुपये ३१.९० लाख इतक्या दंडात्मक रकमेच्या नोटीस देण्यात आल्या आहेत. तसेच, सन २०२१-२२ या कालावधीत संबंधितांविरुध्द १० गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांकरीता ई-पीक पाहणी नोंदणी करण्याबाबत

**(२८) * १५३०७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील पीकपेरा नोंदणी करीता 'माझी शेती, माझा सातबारा, माझा पीकपेरा' या घोषवाक्याच्या आधारे ई-पीक पाहणी सर्वेक्षण सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील पीकपेरा नोंदणी व ई-पीक पाहणी सर्वेक्षणासाठी व्हर्जन-२ हे नवे सॉफ्टवेअर तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ६१ लाख शेतकऱ्यांना उक्त योजनेंतर्गत ई-पीक पाहणी नोंदणी करता आली नाही तसेच सदर नोंदणी करण्यात अमरावती आणि कोकण विभाग मागे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ई-पीक नोंदणी यशस्वी होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) खरीप हंगाम २०२२ मध्ये संपूर्ण राज्यातील १,१०,१७,९०९ शेती खात्यांवर १,४५,७२,८८७.४७ हेक्टर क्षेत्रावर ई-पीक पाहणी नोंदविण्यात आलेली आहे. अमरावती विभागात १७५५१७५ शेती खात्यांवर २९१६०४५.७० हेक्टर क्षेत्रावर पीक पाहणी नोंदविण्यात आली असून विभागाची टक्केवारी ८८.०३% इतकी आहे. कोकण विभागात ८३०३९६ शेती खात्यांवर ५१९३३३.६१ हेक्टर क्षेत्रावर पीक पाहणी नोंदविण्यात आली असून विभागाची टक्केवारी ९२.०९% इतकी आहे.

तसेच खरीप हंगाम २०२२ मध्ये शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणीची मुदत दिनांक १ ऑगस्ट,२०२२ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ निश्चित करण्यात आलेली होती. मात्र ई-पीक पाहणी पासून शेतकरी वंचित राहू नये म्हणून दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तसेच ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी झालेली नाही त्यांची पीक पाहणी तलाठी स्तरावरून नोंदविण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ अंतिम मुदत होती. परंतु हा कालावधी देखील २ वेळेस मुदतवाढ देऊन दिनांक ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेला होता.त्यामुळे ई-पीक पाहणी नोंदविण्यासाठी पुरेशी मुदत देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील उपविभागीय कार्यालयाने मृत आदिवासी महिलेच्या जमिनीच्या मोबदल्यासाठी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२९) * १६३१० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३८२२ ला दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-वडोदरा महामार्गाच्या भूसंपादनामध्ये मौ.नांदीठणे (ता.भिवंडी) येथे वयोवृध्द मयत आदिवासी महिलेच्या नावे असलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी भिवंडी (जि.ठाणे) येथील उपविभागीय कार्यालयामार्फत बनावट कागदपत्राच्या आधारे बनावट महिला उभी करुन रुपये ५८ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे श्रमजीवी संघटनेने माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-वडोदरा महामार्गाच्या भूसंपादनामध्ये देखील बाधित झालेल्या शेतकऱ्यांऐवजी बनावट शेतकरी उभे करुन रुपये १२ कोटींचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी नायब तहसिलदार यांना दिनांक १० जून, २०२२ रोजी निलंबित करण्यात आले असून सदर प्रकरणी अधिकारी/ कर्मचारी यांचा सहभाग आहे किंवा काय याबाबत तपासणी करणेबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांना निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निर्देशाच्या अनुषंगाने अशा प्रकारची अनियमितता पुढील काळात होऊ नये याकरीता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या कार्यालयामार्फत दिनांक २८ एप्रिल, २०२२ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मुंबई-वडोदरा राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पाकरीता मौजे दुगाड, ता.भिवंडी येथील श्रीमती.भागिरथी रामा मुकणे या अनधिकृत व्यक्तीने मूळ खातेदार श्रीमती ठकी सख्या सवर यांच्या नावे बनावट आधारकार्ड, इ. कागदपत्रे तयार करून त्याआधारे बँकेत खोटी केवायसी करून बॅंक खाते उघडून भूसंपादनाचा मोबदला रक्कम रूपये ५८ लाख घेऊन गैरव्यवहार केला आहे.

सदर प्रकरणी भिवंडी उपविभागीय कार्यालयामार्फत शांतीनगर पोलीस स्टेशन ता.भिवंडी येथे गुन्हा नं. (F.I.R) ०६९७/२०२२ दिनांक १६/११/२०२२ रोजी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाबाबत पोलीस तपास सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विषयांकित प्रकरण हे मौजे नांदिठणे गावाशी संबंधित आहे.

मौजे नांदिठणे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील जमिनीचा भूसंपादन मोबदला वाटपाबाबत अनधिकृत व्यक्तींनी बनावट आधारकार्ड, बनावट पॅनकार्ड तयार करून त्याआधारे बँकेत खोटी केवायसी (KYC) करून बँकेत खाते उघडले तसेच बनावट कागदपत्रांचा वापर करून अनधिकृत व्यक्तींनी सह दुय्यम निबंधक भिवंडी वर्ग-२ क्रमांक ३ यांचेकडे नोंदणीकृत संमतीपत्र/ पुरवणी करारनामा दस्त क्र. ६२६९/२०२१ दिनांक ०५/०८/२०२१ आणि नोंदणीकृत कुळमुखत्यारपत्र दस्त क्र.६२७०/२०२१ दिनांक ०५/०८/२०२१ तयार करून शासकीय यंत्रणेची दिशाभूल करून नोंदणीकृत कुळमुखत्यारपत्र धारकाने भूसंपादन मोबदला रक्कम हस्तगत करण्याचे कृत्य करून शासकीय यंत्रणेची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचे कार्यालयामार्फत शांतीनगर पोलीस स्टेशन, ता.भिवंडी येथे गुन्हा नोंद क्रमांक (FIR) क्र.०२३२ दिनांक २५/०४/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाबाबत पोलीस तपास सुरू आहे.

(३) होय हे अंशत: खरे आहे.

कल्याण-कसारा तिसरी रेल्वे लाईन या प्रकल्पाचा भूसंपादनाचा मोबदला अदा करणेसाठी लाचेची मागणी केलेल्या प्रकरणी तत्कालीन नायब तहसिलदार श्री.विठठल गोसावी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी मुंबई यांनी दिनांक २४/०२/२०२२ रोजी कारवाई केली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक १०७/२०२२ दिनांक २४/०२/२०२२ रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच शासनाचे महसूल व वन विभागाकडील आदेश क्र. मप्रन्या- २०२२ / प्र. क्र. ११२/ई-९ दिनांक १०/०६/२०२२ रोजी अन्वये तत्कालिन नायब तहसिलदार श्री.विठ्ठल गोसावी यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) होय.

(५) मुंबई-वडोदरा राष्ट्रीय महामार्ग प्रकरणी भिवंडी तालुक्यामधील जमिनीचा भूसंपादन मोबदला वाटपाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत चौकशी समितीचा अहवाल नुकताच दिनांक १४/१२/२०२२ रोजी प्राप्त झाला असून, सदर अहवालाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांची तात्काळ बदली करण्यात येत असून, पुढील चौकशी संदर्भात अहवालाची छाननी चालू आहे.

(६) अशी बाब नाही.

-----------------

## मिरज (जि.सांगली) येथील बंद पडलेल्या शासकीय दूध डेअरीच्या जागेवर विकासकामे करण्याबाबत

**(३०) * १६४२२ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथील शासकीय दूध डेअरी बंद पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय दूध डेअरी बंद पडलेल्या ५२ एकर जागेवर न्यायालये, मराठा विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, फुटबॉल मैदान, तंतुवाद्य निर्मिती करण्यासाठीच्या मागणीचे निवेदन मराठा महासंघातर्फे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मिरज (जि.सांगली) येथील शासकीय दूध डेअरी बंद असल्याने ५२ एकर जागेवर विविध शासकीय योजनांची विकास कामे करण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) होय, तथापि, कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ११/११/२००२ च्या शासन निर्णयानुसार शासकीय दुध योजनांच्या जागा दुग्ध व्यवसायासाठी संबंधित सहकारी दुध संस्थाना देण्याचे धोरण आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील ८९ हजार विमाधारक शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत

**(३१) * १६४८२ डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात यावर्षीच्या खरीप हंगामामध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले असून ८९ हजार शेतकरी पीक विमा लाभार्थी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८९ हजार विमाधारक शेतकऱ्यांपैकी ५७ हजार ९६६ शेतकऱ्यांचे पीक विमा दावे पीक विमा कंपनीकडून नाकारण्यात येऊन ३१ हजार ८३९ शेतकऱ्यांच्या पिकांचे सर्वेक्षण करणे प्रलंबित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पीक विमा दावे नाकारणाऱ्या व पिकांचे सर्वेक्षण प्रलंबित ठेवणाऱ्या पीक विमा कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२२ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत एकूण ३,९४,६६० सूचना प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त सूचनांपैकी दिनांक ०८/१२/२०२२ अखेर २,५२,४४७ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १६१.२८ कोटी निश्चित करण्यात आले असून त्यापैकी २,३३,८६९ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १६०.४२ कोटी वाटप करण्यात आले आहेत. उर्वरीत नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत-जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यात मातोश्री ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३२) * १५७५६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत-जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गतील कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन यांना दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी तसेच मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
तथापि, गैरव्यवहार झाल्यासंदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे दादेगांव (ता.आष्टी जि.बीड) श्री.रामचंद्र देवस्थान न्यासाची ३५० एकर जमीन बळकावल्याबाबत

**(३३) * १५९८६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दादेगांव (ता.आष्टी, जि.बीड) श्री.रामचंद्र देवस्थान न्यास नोंदणी क्र. A-१६८० येथील देवस्थानची शिराळ (ता.आष्टी, जि.बीड) येथे असलेली ३५० एकर जमीन पदाधिकाऱ्याने हस्तगत केल्याची तक्रार दादेगांव येथील ग्रामस्थांनी तहसिलदार, आष्टी यांच्याकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील देवस्थान जमिनीमध्ये गट क्र. १५ मध्ये पाझर तलाव क्र. २ शिराळ (ता.आष्टी, जि.बीड) स.नं.४१ व स.नं. ४२ मधील एकूण ३.५१ हे.आर. व गाव तलाव क्र. २ शिराळ येथील स.नं. १५/१ मधील १.३१ हे.आर. क्षेत्र भूसंपादीत करुन त्याबाबतचा मावेजा रक्कम निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या आदेशान्वये भूसंपादन अधिनियम, कलम ३० नुसार मावेजा रक्कम जिल्हा न्यायालयात जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भूसंपादनाचा मोबदला देवस्थानाऐवजी त्यांना मिळण्याकरीता संबंधिताने व त्यांच्या कुटुंबियांनी उक्त जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भातील देवस्थान व इतर व्यक्ती यांच्यातील वादाबाबतचा मा.जिल्हा न्यायालय, बीड येथे दावा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देवस्थानाची नियमबाह्य पध्दतीने घेतलेली ३५० एकर जमीन परत विश्वस्तांना देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) मौ.शिराळ, ता.आष्टी, जि.बीड येथील श्रीराम देवस्थान न्यासाची विविध एकूण ३१ सर्वे क्रमांकामध्ये जमीन असून स.क्र.४१, ४२ व १५/१ मधील ४.८२ हे.आर क्षेत्र संपादीत करण्यात आले आहे. सदर प्रकरणात कोणतेही प्रकारचे बेकायदेशीररित्या खाजगी व्यक्तीच्या नावे हस्तांतरण झालेले नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सुरु करण्याबाबत

**(३४) * १६०२५ श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परराज्यात शिक्षण घेणाऱ्या राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती तत्कालीन शासनाने रद्द केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे परराज्यात व्यावसायिक शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्यामुळे शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सदर शिष्यवृत्ती पुन:श्च सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी जे राज्याबाहेर परराज्यात खाजगी विनाअनुदानित व कायम अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ पासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी प्रतीपूर्ती, निर्वाहभत्ता प्रदाने इ. विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास दिनांक २५/०३/२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली. तथापि, सदर प्रकरणी नवीन धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने तसेच दिनांक २५/०३/२०२२ रोजी जरी शासन निर्णय निर्गमित केला असला तरी कोणत्याही विद्यार्थ्यास लाभ देण्यात आलेला नसल्याने सदर परिपत्रकास दिनांक ०२/०८/२०२२ च्या परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली.

महाराष्ट्र राज्यातील परराज्यात भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती ऑफलाईन देणेबाबत दिनांक २५/०३/२०२२ व दिनांक ०२/०८/२०२२ रोजीच्या दोन्ही शासन परिपत्रकामध्ये स्पष्टता नव्हती. सबब दिनांक १२/०९/२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये उपरोक्त दोन्ही परिपत्रके रद्द करुन महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील परराज्यात शासनमान्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१७-१८ पासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुधनाच्या लम्पी आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) * १५७०६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.अरुण लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५५ पैकी २७२ तालुक्यांमध्ये लम्पी नावाच्या चर्मरोगाच्या प्रादुर्भावामुळे ४ हजार गोवंशीय पशुधन मृत्यूमुखी पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पशुसंवर्धन विभागातील मंजूर ४,९५१ पदांपैकी सद्य:स्थितीत ३,१४९ पदे भरलेली असून पशुवैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे १,८०२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेषत: सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात पशुधन अधिकाऱ्यांची अनुक्रमे २३१ व ५४ पदे रिक्त असून, कोल्हापूर जिल्ह्यात ३० हजार पशुधनामागे एक पशुधन विकास अधिकारी कार्यरत असल्याने ९० पशुवैद्यकीय दवाखान्यात फक्त २९ पशुधन विकास अधिकारी कार्यरत आहेत, त्यामुळे पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवरील सेवा रद्द करुन त्यांना मूळ पदावर सेवेत रुजू करुन घेणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पशुसंवर्धन विभागातील पदे रिक्त असल्यामुळे लम्पी आजारावर नियंत्रण आणण्यात अडथळे निर्माण होत असून जनावरांच्या लसीकरणाचा वेग मंदावला आहे त्यामुळे जनावरांना/पशुंना वैद्यकीय मदत मिळण्यास गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लम्पी आजाराने पशुधन मृत्यूमुखी पडलेल्या पशुपालकांना शासकीय मदत मंजूर करण्यासाठी अनेक प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असून पशुधन पालकांना नुकसान भरपाई म्हणून आर्थिक सहाय्य करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लम्पी आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) राज्यात दिनांक ०४/०८/२०२२ रोजी लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव प्रथमत: चिनावल, ता.रावेर, जि.जळगाव येथे आढळून आला. तद्नंतर माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर राज्यातील ३३ जिल्ह्यात २९१ तालुक्यांत लम्पी चर्मरोगाने ११,५४७ पशुधनाचा मृत्यू झालेला आहे.
(२) राज्यातील पशुसंवर्धन विभागामधील मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे-

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट-अ | २६४४ | २१४७ | ४९७ |
| गट-ब | ४१९ | ५३ | ३६६ |
| गट-क | १८९५ | ७६८ | ११२७ |
| गट-ड | १९०५ | ७०२ | १२०३ |
| एकूण | ६८६३ | ३६७० | ३१९३ |

उक्त भरलेल्या पदांपैकी ११ पशुवैद्यकीय अधिकारी हे प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.
(३) पशुसंवर्धन विभाग सांगली जिल्ह्यामध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची १११ पदे मंजूर असून, यापैकी ६२ पदे भरलेली व ४९ पदे रिक्त आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची ११८ पदे मंजूर असून, यापैकी ६१ पदे भरलेली व ५७ पदे रिक्त आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील एकही अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत नाही.
(४) व (५) दिनांक ०७ डिसेंबर, २०२२ अखेर राज्यातील एकूण १,३९,९२,३०४ गोवर्गीय पशुधनांपैकी १,३९,७८,०४३ पशुधनास लम्पी प्रतिबंधात्मक गोटपॉक्स लसीचे लसीकरण करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये शेतकरी /पशुपालक यांच्या मृत पशुधनास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती धोरणामधील निकषानुसार अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये प्रती मृत गाय रुपये ३०,०००/-, प्रती मृत बैल रुपये २५,०००/- व प्रती मृत वासरु रुपये १६,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. दिनांक ०७/१२/२०२२ अखेर एकूण रुपये ३०६१.१५ लक्ष निधी मृत पशुधनांच्या पशुपालकांस अर्थसहाय्यापोटी वाटप करण्यात आला आहे. उर्वरित अर्थसहाय्य वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, लोकसेवा आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्याद्वारे सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे. तसेच लम्पी चर्मरोग प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९३ पदे आणि पशुधन पर्यवेक्षक (गट-क) यांची ११५९ पदे (राज्य स्तर २८६ व जिल्हा परिषद स्तर ८७३) कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देण्यात

आलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्यात आल्यामुळे नवीन पदभरतीद्वारे गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हरितपट्ट्यांच्या संवर्धनासाठी कायमस्वरूपी निधीची तरतूद करण्याबाबत

**(३६) * १५५१४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि इतर हरितपट्टयांच्या संवर्धनासाठी कायमस्वरुपी निधीची आवश्यकता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या (आय.आय.टी.) प्रा.हरिप्रिया यांनी गत पाच वर्षापासून केलेल्या "संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरणीय सेवांचे आर्थिक मूल्य" या अभ्यास प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण पर्यावरणीय सेवांचे मूल्य रुपये १५ लाख कोटींहून अधिक असल्याचेही दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हरितपट्टयामार्फत नागरिकांचे शारिरीक आणि मानसिक आरोग्य सांभाळले जाणे, जल, वायू आणि भूमी प्रदूषण कमी करुन मुंबईच्या पाणीपुरवठ्याच्या शुद्धीकरणाचा खर्च वाचविणे, तसेच हवेतील हानीकारक वायू साठविणे अशी महत्त्वाची कामे करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कामे कृत्रिमरित्या करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हरितपट्टयांच्या संवर्धनासाठी कायमस्वरुपी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या Economic Value of Ecosystem Services बाबत प्रा.हरिप्रिया, आयआयटी, मुंबई यांनी अहवाल तयार केला असून त्यामध्ये उद्यानाच्या पर्यावरणीय सेवांचे आर्थिक मूल्य रुपये १५.३७ लाख कोटी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(५) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे क्षेत्रफळ १०३.६८ चौ.कि.मी. असून त्यापैकी ८६.९६ चौ.कि.मी. क्षेत्र वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत राष्ट्रीय उद्यान म्हणून दिनांक १६/०१/१९९६ रोजी अधिसूचीत करण्यात आले आहे. त्यामुळे सदर क्षेत्रामध्ये वन्यजीव व जैवविविधतेला कायमस्वरुपी संरक्षण प्राप्त झाले आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संरक्षण व संवर्धन कामी शासनाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये संरक्षण व संवर्धन कामी वनसंरक्षक व संचालक- १, उप संचालक- २, सहाय्यक वनसंरक्षक- ३, वनक्षेत्रपाल-६, वनपाल-१५, वनरक्षक- १२७ व वनमजुर- १२० ई. कायमस्वरुपी कर्मचारी कार्यरत आहेत.
- शासनामार्फत संरक्षण व संवर्धनाचे कामांकरीता राज्य योजना आणि जिल्हा वार्षिक योजनांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत असतो.
- त्याच बरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास पर्यटनामुळे प्राप्त होणारा महसूल हा उद्यानाच्या संरक्षण व संवर्धनासाठी वापरण्याकरीता स्वीय प्रपंची लेखा खाते उघडण्यात आले असून, प्राप्त होणाऱ्या महसूलातून उद्यानाच्या संवर्धनाची कामे करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथील मासेमारांसाठी लहान धक्का (जेट्टी) उभारण्याबाबत प्रक्रियेमधील १० टक्के नजराणा रक्कम परत मिळण्याबाबत

**(४४) * १६३७९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरत-नागपूर महामार्ग क्र.६ चे विस्तारीकरण व चौपदरीकरणात भूसंपादन संपादीत क्षेत्राकरीता शेतकऱ्यांना मिळालेल्या मोबदल्यातून १० टक्के नजराणा रक्कम शासनास जमा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी बहुल भागातील शेतकऱ्यांची शासनास जमा केलेली १० टक्के नजराणा रक्कम शेतकऱ्यांना परत करण्यात यावी असा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेडकी व मोरकंरजा (ता.नवापुर, जि.नंदुरबार) हा आदिवासी बहुल भाग पेसा क्षेत्रात मोडत असून सदर गावातील भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची १० टक्के नजराणा रक्कम शेतकऱ्यांना परत मिळण्याकरीता ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादन संपादीत क्षेत्राकरीता शेतकऱ्यांना मिळालेल्या मोबदल्यातून जमा केलेली १० टक्के नजराणा रक्कम शेतकऱ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) इनाम/ वतन जमिनी तसेच शासनाने प्रदान केलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी व्यतिरिक्त इतर उर्वरित स्वमालकीच्या भोगवटादार वर्ग-१ च्या जमिनींबाबत भूसंपादन करताना शासनास जमा केलेली १० टक्के रक्कम परत करण्याबाबत कार्यवाहीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्याची शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील खरेदी-विक्री संघास शासकीय भूखंड मिळणेबाबत

**(४५) * १५१८५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरेदी-विक्री संघ, वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) ची सन १९८६ मध्ये स्थापना झाली असून ३६ वर्षांपासून हा संघ सहकार क्षेत्रात कार्यरत आहे, या संघामार्फत तालुक्यातील शेतकऱ्यांना खत विक्री, शेतकऱ्यांची भात खरेदी तसेच शेतकऱ्यांना उपयुक्त साधनसामुग्रीची व्यवस्था केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरेदी-विक्री संघाला माल साठविण्यासाठी स्वमालकीची जागा उपलब्ध नसल्याने वैभववाडी, भूमी अभिलेख कार्यालयाजवळील सर्व्हे क्र. ४०/ब/३/१ या शासकीय भूखंडापैकी पाच गुंठे भूखंड हा खरेदी-विक्री संघाचे कार्यालय व गोदाम बांधण्यासाठी मिळावा म्हणून गत ४ वर्षांपासून तहसिलदार, वैभववाडी व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भूखंड मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे खरेदी-विक्री संघास अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असून संघाचे चेअरमन यांनी लेखी निवेदनाद्वारे भूखंड मिळण्याबाबतची मागणी मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खरेदी-विक्री संघास विनाविलंब भूखंड मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) खरेदी विक्री संघ वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) यांना माल साठविण्यासाठी स्वमालकीची जागा नसल्याने वैभववाडी शासकीय जमिनीपैकी पाच गुंठे जमीन मिळणेबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिनांक १२/१२/२०१९ रोजी अर्ज केला होता.सदर अर्जासोबत आवश्यक कागदपत्र नसल्याने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ०१/०१/२०२० च्या पत्रान्वये संबंधितांना आवश्यक कागदपत्र उपलब्ध करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मात्र जागा मागणीबाबतचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

उक्त भूखंड मिळणेबाबत चेअरमन, वैभववाडी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री सिंधुदुर्ग यांना ०७ ऑक्टोबर,२०२२ च्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २५/११/२०२२ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेस आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत कळविले असून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## शेटफळ (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील बारामती ॲग्रो लि. या साखर कारखान्याने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत

**(४६) * १५७५० प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेटफळ (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील बारामती ॲग्रो लि. या साखर कारखान्याने गाळप हंगाम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ पूर्वी सुरू करून शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित साखर कारखान्याच्या व्यवस्थापकांसह तसेच सूट दिलेल्या साखर आयुक्तांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निवेदनानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असून अहवालाची छाननी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन प्रकरणातील दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर चौकशी करुन कारवाई करणेबाबत

**(४७) * १६१९७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन प्रकरणात देण्यात येणाऱ्या मावेजांच्या निधीचे प्रस्ताव शासनाने विहित मुदतीत पाठविले नसल्याने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सचिवांकडे १ वर्षाची मुदत वाढवून मागितल्याचे दिनांक २४ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादनात गेल्या असून प्रशासनाच्या दिरंगाईमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या प्रकरणात दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ च्या शासन निर्णयानुसार उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उस्मानाबाद जिल्ह्यातील रोहयो अंतर्गत कलम १८ नुसार २३२१ प्रकरणे दाखल झाली असून त्यांतील बहुतांश प्रकरणे निधीअभावी प्रलंबित आहेत तर काही प्रकरणे ही दिवाणी न्यायालयात न्यायप्रविष्ट असून निधी मागणीचे प्रस्ताव हे संबंधित यंत्रणांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील विभागात सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रलंबित भूसंपादन प्रकरणांची सद्य:स्थिती विचारात घेऊन जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी विनंती केल्यानुसार शासनाच्या दिनांक २३/११/२०२१ च्या परिपत्रकास १ वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाजीपूर गवा (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या अभयारण्याचा दर्जा वाढविण्याबाबत

**(४८) * १५७०५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिले अभयारण्य म्हणून प्रसिध्द असलेल्या दाजीपूर गवा (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या अभयारण्याचा सन १९८५ मध्ये विस्तार करून राधानगरी वन्यजीव अभयारण्याची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभयारण्याचा दर्जा उंचावण्याची गरज निर्माण झाली असून पन्हाळा, गगनबावडा आणि शाहूवाडी परिसरातील असलेल्या वन्यजीव संपदेला अभय मिळवण्यासाठी आणखी एका अभयारण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभयारण्यातील वन्यजीवांचा विकास करणे, ग्रामस्थांचा हस्तक्षेप व अतिक्रमण टाळणे यासाठी नियमाप्रमाणे तेथील मानवी वस्त्या, गावे आणि ग्रामस्थांचे पुनर्वसन करणे आवश्यक असून त्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सन १९५८ मध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या शिकार अभयारण्याचा (Game Sanctuary) दिनांक १६/०९/१९८५ रोजी विस्तार करुन त्यामध्ये राधानगरी तालुक्यातील २८ गावे व गगनबावडा तालुक्यातील १ गाव अशा एकूण २९ गावातील क्षेत्र समाविष्ट करुन ३५१.१६ चौ.कि.मी. क्षेत्र राधानगरी वन्यजीव अभयारण्य (विस्तारित) म्हणून अधिसूचीत करण्यात आले आहे.

(२) सदर क्षेत्रातील वन्यजीव व वनसंपदेला अभय मिळण्याच्या उद्देशाने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ३६-क अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यात विशाळगड संवर्धन राखीव क्षेत्र (९२.९६ चौ.कि.मी.), चंदगड तालुक्यात चंदगड संवर्धन राखीव क्षेत्र (२२५.२४ चौ.कि.मी.) तसेच पन्हाळा तालुक्यात पन्हाळगड (७२.९० चौ.कि.मी.) व मसाई पठार संवर्धन राखीव क्षेत्र (५.३४ चौ.कि.मी.) अधिसूचित करण्यात आले आहे. तसेच गगनबावडा, आजरा व भुदरगड तालुक्यातील वनक्षेत्र गगनबावडा संवर्धन राखीव (१०४.३९ चौ.कि.मी.), आजरा-भुदरगड संवर्धन राखीव क्षेत्र (२३९.२१ चौ.कि.मी.) म्हणून अधिसूचीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) राधानगरी वन्यजीव अभयारण्यातील १२ महसुली गावांचे पुनर्वसन प्रस्तावित असून त्यापैकी न्यु करंजे व एजिवडे या २ गावांची पुनर्वसन प्रक्रिया सद्य:स्थितीत कार्यान्वित करण्यात आली असून या करीता आतापर्यंत रक्कम रुपये ४०.२४ कोटी खर्च करण्यात आला आहे.

(४) पुनर्वसनाची कार्यवाही सुरू असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.